# बिट्स पिलानीच्या प्राध्यापकांकडून मुष्टिफंड आर्यनच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



पणजी : मुष्टिफंड आर्यन उच्च माध्यमिक विद्यालयात मार्गदर्शनासाठी आलेल्या बिट्स पिलानी गोवा विभागाच्या प्राध्यापकांना भेटवस्तू देताना प्रा. व्यंकटेश प्रभुदेसाई, समोर विद्यार्थीवर्ग.

पणजी, ता. ५ (प्रतिनिधी) : राज्यातील बिटस पिलानी संस्थेच्या प्राध्यापकांनी मुष्टिफंड आर्यन उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना अलीकडेच विविध अभियांत्रिकी शाखांतील संशोधन, नावीन्याविषयी मार्गदर्शन केले,

या प्राध्यापकांत बिटसच्या जीवशास्त्रविषयक विज्ञान विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक डॉ. मिनल कौशीक, मेकॅनिकल इंजिनियरिंग विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. सचिन वायगावकर, प्रशासकीय डीन डॉ. डी. एम. कुलकर्णी यांचा समावेश होता.

नॅनो बायोटेक्नोलॉजी, जनुकीय विज्ञान, टिस्यू इंजिनियरिंग या विषयांबरोबरच नवीन संशोधनावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. थर्मल इंजिनिअरिंगमधील नवे तंत्रज्ञान, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा वाढता प्रभाव व शाखेतील उपलब्धीची माहिती श्री. कुलकर्णी यांनी दिली. डिझाईन इंजिनियरिंग, उत्पादनशिलतेतले तंत्रज्ञान या विषयांवरही त्यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. वायगावकर यांनी उत्पादनशिलतेतले कौशल्य, महत्त्व व गरजेची माहिती देताना विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषय समजून घेण्याची, ज्ञान मिळवण्याची आवश्यकता व्यक्त केली. पौराणिक कथांचे उदाहरणही त्यांनी दिले.

ज्ञान, विज्ञानाचा वापर नित्य समस्या सोडवण्यासाठी व्हावा असा संदेशही प्राध्यापकांनी दिला. मुष्टिफंडचे संचालक व्यंकटेश प्रभुदेसाई यांनी स्वागत केले, तर प्रशासकीय अधिकारी एम. बी. एस. काकोडकर यांनी प्राध्यापकांची ओळख करून दिली.

Scanned by CamScanner